चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
०६ एप्रिल, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# देशी दारू बाळगणा—या आरोपीस ०३ वर्ष कारावास व २५ हजार रू दंडाची शिक्षा

पोलीस स्टेशन चिमुर अंतर्गत मौजा काजलसर येथे देशी दारू बाळगणा—या आरोपीस ०९/०४/२०१९ रोजी **श्री. छल्लानी, न्यायदंडाधिकारी कोर्ट चिमुर, जि. चंद्रपुर यांनी ०३ वर्ष कारावासाची** शिक्षा ठोठावली.

दिनांक २०/०९/२०१५ रोजी चिमुर येथील पोलीस पथकास मिळालेल्या गोपनीय माहितीवरून मौजा काजलसर येथील आरोपी नामे निळकंठ बांबोडे यांचे घराची झडती घेतली असता त्याचे घरात स्वयंपाक खोली मध्ये एका पिशवीत देशी दारूच्या २० नग निपा किंमत २,००० रू. अवैद्यरित्या मिळुन आल्या. अरोपीस ताब्यात घेउन त्याच्या विरूध्द पोलीस स्टेशन चिमुर येथे कलम ६५ ई मुदाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोस्टे चिमुर येथिल पोलीस हवालदार **श्री. पखारू सोरते, ब.न. १८५०** यांनी पुर्ण करून आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक २०/०९/२०१९ रोजी **आरोपी नामे निळकंठ हैबत बांबोडे वय ४४ रा. काजलसर, चिमुर यास सीआरपीसी कलम २५५(२) अन्वये कलम ६५ ई मुंबई दारूबंदी कायदा अन्वये ०३ वर्ष कारावासाची आणि २५,०००/—रू दंड, न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा श्री. छलानी, प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी कोर्ट चिमुर, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. संजय आर. ठावरी, सरकारी अभियोक्ता, चिमुर** यांनी काम पाहीले असुन कोर्ट पैरवी म्हणुन **नापोशी. बलदेव कुमरे पोस्टे. चिमुर,** यांनी काम पाहिले.

———————————————————————————

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)


# लोकसभा निवडणुक २०१९
## कायदा व सुव्यस्था अबाधित राखण्यासाठी करण्यात आलेली कार्यवाही

लोकसभा निवडणुक २०१९ दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहुन सदर निवडणुक निर्भयपणे व शांततापुर्ण वातावरणात पार पाडण्याकरीता आचार संहिता लागु झाल्यापासुन विविध विशेष मोहिमेव्दारे चंद्रपुर पोलीसांनी अवैद्य धंदे, सक्रिय गुन्हेगार, सराईत गुन्हेगार, दारू व्यवसाय यांच्यावर प्रभावी कारवाई केलेली आहे.

दि. १० एप्रिल २०१९ पासुन लागु झालेल्या आचांर संहितेनंतर आजपावेतो संपुर्ण जिल्हयात एकुण ७२५ **दारूचे गुन्हे** दाखल करण्यात आले आहे ज्यामध्ये **एकुण ८६२ आरोपींसह रू. ०३ कोटी ८५ लक्ष ६६ हजार** च्यावर मुद्देमाल जप्त करण्यात आला. यासोबतच **अंमली पदार्थ विरूध्द एक गुन्हा** नोंद करण्यात आला असुन यामध्ये **एका आरोपीसह एकुण ४,३१० रू मुद्देमाल** जप्त करण्यात आला आहे व **अवैध शस्त्रासंबंधी एक गुन्हा** नोंद असुन त्यामध्ये **एका आरोपी सह** एक तलवार किंमत अंदाजे **१,००० चा मुद्देमाल** जप्त करण्यात आला आहे.

**रोख रक्कम** च्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाही मध्ये **एकुण ४६ लक्ष ६१ हजार ५८० रू. ची रोख रक्कम** भरारी पथक, एस.एस.टी. पॉईन्ट व पोलीसांनी जप्त केली आहे.

यासोबतच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहुन निवडणुक कालावधीत शांतता राहवी याकरीता म्हणुन विविध कलमांर्तगत **एकुण १९२९** इसमांवर **प्रतिबंधात्मक कार्यवाही** करण्यात आली आहे यामधीलच काही न जुमाननारे सराईत गुन्हेगार आणि दारूविक्रेते ज्यांवर पोलीस विभागातर्फे वारंवार कार्यवाही करून सुध्दा ते आटोक्यात येत नसल्याने **एकुण १७ गुन्हेगांराना जिल्हयातुन हद्दपार करण्यात आले आहे.** ज्यामध्ये

यामध्ये **पोलीस स्टेशन वरोरा** येथील १) मनोहर नारायण दांडेकर रा. यात्रा वार्ड, वरोरा, २) साजीद अजीज शेख रा. कालरी वार्ड वरोरा, ३) राजु उर्फ राजेश शंकर वाटमोडे रा. नागरी वरोरा, ४) शेख इब्राहीम शेख आजम, रा. टेमुर्डा, ५) सुभाष कालु पवार रा. यात्रा वार्ड वरोरा, यांना ३०/०३/२०१९ अन्वये ०३ महिने ते ०६ महिने करीता चंद्रपुर जिल्हयातुन हद्दपार करण्यात

आले आहे. **पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर १)** भारती उर्फे स्नेहा उर्फ मुस्कान सुरेश खैरे वय २५ रा. नुरानी मस्जिद जवळ भिवापुर चंद्रपुर यास ०३/०३/२०१९ अन्वये ०६ महिने करीता हद्दपार, **पोलीस स्टेशन चिमुर १)** जगदीश आनंदराव रामटेके वय ३४, रा. मालेवाडा तह. चिमुर, जि. चंद्रपुर यास दिनांक २५/०३/२०१९ अन्वये ०४ महिने करीता हद्दपार, **पोलीस स्टेशन भद्रावती १)** सुधिर बंडु दोहतरे वय २६ रा. चंदनखेडा भद्रावती, यास दिनांक २०/०३/२०१९ अन्वये ०३ महिने करीता हद्दपार, **२)** प्रविण मंगल कटारे वय २२ रा. शिवाजीनगर भद्रावती, यास दिनांक २०/०३/२०१९ अन्वये ०१ वर्षाकरीता हद्दपार, **पोलीस स्टेशन सिंदेवाही १)** माणिक वासुदेव गेडाम वय ४० रा. आंबेडकर वार्ड सिंदेवाही यास दिनांक २०/०३/२०१९ अन्वये ०४ महिने करीता हद्दपार, **२)** धमेंद्र देवाजी मेश्राम वय ४० रा. नवरगाव सिंदेवाही यास दिनांक २०/०३/२०१९ अन्वये ०४ महिने करीता हद्दपार, **पोलीस स्टेशन पाथरी १)** अन्नपुर्णा जिवन पलंचीवार वय ४५ वर्ष रा. अंतरगाव ता. सावली जि. चंद्रपुर यास दिनांक २९/०३/१९ अन्वये ०३ महिने करीता हद्दपार, **पोलीस स्टेशन शेगाव १)** जसपालसिंग उर्फ गोपालसिंग दिपासिंग बावरी वय ४५ वर्ष रा. वहानगाव ता. चिमुर यास दिनांक २५/०३/२०१९ अन्वये ०६ महिने करीता हद्दपार तसेच पोलीस स्टेशन सिंदेवाही येथिल एकुण ०४ असे एकुण १७ आरोपीतांना जिल्हयातुन हद्दपार करण्यात आले आहे.

———————————————————————————————